प्राथमिक शिक्षक संवर्गातील कर्मचाऱ्यांना विस्तार अधिकारी (शिक्षण) श्रेणी-2 वर्ग-3 ( मराठी माध्यम) या पदावर दिंव्यांग प्रवर्गातुन पदोन्नती देणे बाबत.

जिल्हा परिषद अहिल्यानगर
प्राथमिक शिक्षण विभाग
आदेश जा.क्र.कार्या-1/पीई-5/ 180/2025
अहिल्यानगर दि. 16/06/2025.

**वाचा :-** 1. ग्रामविकास व जलसंधारण विभाग मंत्रालय मुंबई यांचेकडील दिनांक 10 जुन 2014 ची अधिसुचना
2. महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारीत वेतन) नियम दिनांक 01/03/2019.
3. महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्रं.-एसआरव्ही-2018/प्र.क्र.59/का-12 दि.01/08/2019.
4. सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र.बीसीसी-2018/प्र.क्र.366/16-ब दि.07/05/2021.
5. महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक दिव्यांग/2022/प्र.क्र.83/16-अ मंत्रालय, मुंबई दि.20 एप्रिल, 2023.
6. महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक दिव्यांग/2022/प्र.क्र.83/16-अ मंत्रालय, मुंबई दि.20 एप्रिल, 2023.
7. पदोन्नती निवड समिती इतिवृत्त दि.24/03/2025.
8. समुपदेशन प्रक्रिया दिनांक 13/06/2025

**::: आदेश :::**

ग्रामविकास व जलसंधारण विभाग मंत्रालय मुंबई यांचेकडील दिनांक 10 जुन 2014 रोजीचे अधिसुचनेतील तरतुदीनुसार शिक्षक (गट-क) या संवर्गातील पदवी व बी.एड अर्हताधारक कर्मचाऱ्यांना संदर्भ क्रमांक 5 व 6 चे शासननिर्णयातील तरतुदीचे आधारे विस्तार अधिकारी श्रेणी-2 वर्ग-3 मराठी माध्यम या पदावर निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात खालील अटींच्या अधिन राहुन वेतनस्तर व मॅट्रीक्स एस-15 (41800-132300) या वेतनश्रेणीमध्ये रकाना क्रमांक ६ मध्ये नमूद केलेल्या ठिकाणी पदस्थापना देण्यात येत आहे. सदर पदोन्नतीने दिलेली पदस्थापना ही संदर्भ क्रमांक 4 मध्ये दिलेल्या सुचनेप्रमाणे मा.सर्वोच्च न्यायालयात राज्य शासनाने विशेष अनुमती याचिका क्र.28306/2017 वरील अंतिम निर्णयाच्या अधिन राहुन पदोन्नतीच्या कोटयातील रिक्त पदे निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात सेवाज्येष्ठतेनुसार भरण्यात येत आहेत.

| अ. क्र. | कर्मचाऱ्याचे नाव | पद | शाळा/ केंद्र | तालुका | निवड प्रवर्ग | पदोन्नतीने दिलेले बीट/ कार्यालय | तालुका |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | | 5 | 6 | |
| 1 | निलेश शिवनाथ क्षीरसागर | मुख्याध्यापक | मिरी | पाथर्डी | दिंव्यांग (बहुविकलांग) | मिरी | पाथर्डी |

**अटी व शर्ती :-**

1. सदरची पदोन्नती ही मा.सर्वोच्च न्यायालयात राज्य शासनाने दाखल केलेली विशेष अनुमती याचिका क्र.28306/2017 च्या न्यायालयीन निर्णयाच्या अधीन राहून निव्ळ तात्पुरत्या स्वरुपात दिलेली आहे.
2. सदर पदोन्नती ही तात्पुरत्या स्वरुपात असल्यामुळे पदोन्नतीमुळे जेष्ठतेचा हक्क प्राप्त् होणार नाही.
3. पदोन्नतीने नेमणुकीचे ठिकाणी विहित करुन दिलेल्या कालावधीत हजर न झाल्यास तसेच पदोन्नतीने नेमणुकीच्या पदस्थापनेत बदल करणे साठी दबाव आणल्यास महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम 1964 मधील नियम 4 नुसार कारवाई करण्यात येईल.

4. संबंधीत कार्यालय प्रमुखांनी पदोन्नतीने निवड केलेल्या कर्मचाऱ्यास नियुक्तीचे ठिकाणी हजर होणेसाठी पर्यायी व्यवस्था करुन तात्काळ कार्यमुक्त करावे. तसेच कार्यालयाची निकड विचारात घेऊन पदोन्नती देण्यात आलेली असल्याने सात दिवसांचे आत पदोननतीचे ठिकाणी हजर व्हावे. अन्यथा सेवाज्येष्ठता डावलली जाईल.
5. सदर पदोन्नतीची नोंद संबंधित कर्मचाऱ्यांचे मुळ सेवापुस्त्‌कात घेण्यात यावी.
6. पदोन्नतीने हजर झालेल्या कर्मचाऱ्याने पदोन्नतीचे अनुषंगाने वेतननिर्श्चिती करिता 1 महिन्याचे आत विकल्प देणे बंधनकारक राहील.

सदर आदेश जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द् केलेला असून त्याचा संकेतांक क्रमांक 202506161600 5 असा आहे.

आनंद भंडारी (भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

**प्रति,**

श्री.निलेश शिवनाथ क्षीरसागर मुख्याध्यापक जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मिरी ता.पाथर्डी

व्दारा

गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती, पाथर्डी

2/- सदर आदेशाची प्रत संबंधित कर्मचारी यांना बज़ावून दिनांकीत स्वाक्षरी घेणेत यावी. तसेच संबधीत कर्मचारी यांना पदस्थापनेचे ठिकाणी हजर होणेसाठी पर्यायी व्यवस्था करुन तात्काळ कार्यमुक्त करुन हजर अहवाल इकडेस सादर करण्याची दक्षता घ्यावी.

**प्रत** :- गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती ----------------------
**प्रत** :- कार्या-2,आस्था-2 शिक्षण विभाग जिल्हा परिषद,अहिल्यानगर
**प्रत** :- शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक) जिल्हा परिषद अहिल्यानगर

स्वाक्षरी /-
आनंद भंडारी (भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर